नोव्हेंबर-२०२४ * अंक-५ वा

# अजिंठा

## रोटरी क्लब जळगाव

क्लब क्र.15512 रो.डिस्ट्रीक्ट 3030 रोटरी वर्ष 2024-25





आर.आय.प्रेसिडेंट
**रो. स्टेफनी अर्चिक**



डिस्ट्रिक्ट गव्हर्नर
**रो. राजिंदरसिंग खुराना**



प्रेसिडेंट
**रो. ॲड. सागर चित्रे**




ऑन.सेक्रेटरी
**रो. पराग अग्रवाल**



बुले.कमिटी चेअरमन
**रो. स्वाती ढाके**

THE MAGIC OF ROTARY

ROTARY CLUB OF OJAI 75th Anniversary 1948 - 2023




BACHPAN
CLUB THEME 2024-25

## संपादकीय....✍

सर्व बंधू भगिनींना रोटरी प्रणाम!

सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

नोव्हेंबर महिना हा ‘रोटरी फाउंडेशन’ डेझिग्नेटेड मंथ आहे. पान नंबर ५ वर आपण रोटरी फाउंडेशन आणि रोटरी फाउंडेशनची स्थापना करणाऱ्या रो. आर्क सी.क्लम्फ यांच्या बद्दल माहिती दिलेली आहे. जे रोटरी क्लब क्लीवलँडचे सदस्य होते. ज्यांना फादर ऑफ रोटरी फाउंडेशन म्हणून संबोधले जाते . एप्रिल २००५ च्या ‘द वॉल स्ट्रीट जर्नल’ मध्ये रोटेरियंस नी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक करत, रोटरीच्या पोलिओ प्लस प्रोग्राम ला शांततेचे नोबेल प्राईज मिळण्यास पात्र आहे असे म्हटले गेले आहे.

जी.एम.एल. रागिनी या आपल्या डिस्ट्रीक्टच्या मंथली मॅक्झिनच्या सौजन्याने आतापर्यंतच्या सर्व डिस्ट्रिक्ट गव्हर्नर यांची माहिती गोळा केली आहे. ही सर्व माहिती पॉडकास्ट स्वरूपात रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३० च्या यूट्युब चॅनल वर उपलब्ध आहे तरी सर्वांनी ही माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवावी आणि आपल्या डिस्ट्रीक्टच्या यूट्युब चैनल ला सबस्क्राईब करावे. रोटेरीची माहिती असलेले पॉडकास्ट हे आपल्याला मराठी/ हिंदी/इंग्लिश अशा तीन भाषांमध्ये उपलब्ध आहे. या माध्यमातून जास्तीत जास्त रोटरीच्या कार्याचा प्रसार करावा.

गेल्या महिन्यामध्ये भारतातील सुप्रसिद्ध उद्योगपती पदमविभूषण रतन टाटा हे स्वर्गवासी झाले. ते रोटरी क्लब ऑफ बॉम्बे चे सक्रीय सदस्य होते. याचा आम्हांला अभिमान आहे. भारतातूनच नव्हे संपूर्ण जगातून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

मंथनाविना भारतात या, रत्न पंधरावे आलेले!
शून्य असो वा असो अनंत, टाटा सर्वांचे झालेले!
स्वर्गीय रोटेरीयन रतन टाटा यांना शतश: नमन.

**– रो. स्वाती ढाके**

## अध्यक्षीय.....

रोटरी प्रणाम, मित्रांनो,

सर्वांना सर्वप्रथम दिपावलीचे मन:पूर्वक शुभेच्छा ! ऑक्टोबर महिन्यात आपल्या क्लब तर्फे इंटरॲक्ट कमिटी मार्फत ‘मोबाईल सायन्स व्हॅन’ हा उपक्रम राबविण्यात आला. त्यात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ मार्फत १०० विद्यार्थ्यांनी विज्ञानाचे वेगवेगळे प्रयोग दाखविण्यात आले. खरोखरच सदरहू उपक्रम हा विद्यार्थ्यांसाठी उपयोगी ठरले.

तसेच आपल्या क्बलची मिटींग ‘थिएटर ऑफ रिलीव्हन्स’ या विषयावर अत्यंत रंजक झाली. त्यात आपले प्रमुख पाहुण्यांनी नाटकाचे महत्त्व आपल्या सदस्यांना सांगितले. या महिन्यात आपल्या क्लब मार्फत आपण बस स्टॅन्ड येथे लॉ कॉलेजचे विद्यार्थ्यांमार्फत ‘पथनाट्य’ आयोजित केले. ज्यात ‘सायबर क्राईम’ व हुंडाबळीच्या विषयावर जनजागृती केली. बस स्टॅन्डला आपल्या क्लब तर्फे मार्ग फलकाचे वितरण करण्यात आले. व रोटरॅक्ट क्लबची स्थापना ही आय.एम.आर. कॉलेज येथे करण्यात आली. आपल्या क्लबच्या सदस्यांनी या महिन्यात ‘कोजागिरी’ या संगीताच्या कार्यक्रमाचा लाभ घेतला व आपल्या क्लब तर्फे पंक्चरवाली ताई सपना राजपूत यांचा सत्कार करण्यात आला व आपल्या क्लब मार्फत रेल्वे स्टेशन व पांजरापोळ येथे मिठाई वाटप करण्यात आली.

**– रो. ॲड. सागर चित्रे**

# ऑक्टोबर महिन्यातील साप्ताहिक सभा



**✻ ४ ऑक्टोबर –** रोजी आयोजित साप्ताहिक सभेचा विषय होता ''थिएटर ऑफ रिलीव्हन्स्' यासाठी उपस्थित पाहुण्या होत्या अश्विनी नांदेडकर आणि सायली पावसकर (रंगभूमी कलाकर). या फॅमिली मिटींगमध्ये दोन्ही कलाकारांनी अतिशय उत्साहाने सादरीकरण केले.


**✻ ११ ऑक्टोबर –** रोजी आयोजित साप्ताहिक सभा ही बिझनेस मिटींग होती. विविध कमिटीचे कामकाज गेल्या ४ महिन्यात कसे झाले? याचा आढावा घेण्यात आला. तसेच पुढील ३ महिन्याची प्लॅनिंग करण्यात आली व क्लबने सेट केलेले व पूर्ण केलेल्या गोल्स् वर चर्चा करण्यात आली.






**✻ १८ ऑक्टोबर –** रोजी आयोजित साप्ताहिक सभा ही ''कोजागिरी सेलीब्रेशन' होती. यावेळी सुरेख अशी गाणी श्री.पाटील व परदेशी मॅडम यांनी सादर केली. तसेच जळगाव जिल्ह्यातील पंक्चरवाली ताई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीमती सपना राजपूत यांचा सत्कार करण्यात आला. पतीच्या निधनानंतर, मुलांच्या शिक्षणसाठी त्यांनी पंक्चर काढण्याचे दुकान सुरू केले व त्यानंतर विविध गेम्स् खेळण्यात आले.

**✻ २५ ऑक्टोबर –** रोजी आयोजित साप्ताहिक सभेचा विषय होता– 'वास्तूशास्त्र' यावेळी वक्ते होते श्री.अविनाश कुलकर्णी प्रमुख पाहुण्यांचा परिचय रो.सुभाष अमळनेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन रो.सोनार यांनी केले.



# ऑक्टोबर महिन्यातील प्रोजेक्टस्

**✻ ४ ऑक्टोबर –** रोजी रोटरी क्लब जळगाव तर्फे गणपती नगरातील रोटरी हॉल मध्ये कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या फिरत्या प्रयोगशाळेच्या माध्यमातून शंभर पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी विज्ञानाची अनुभूती घेतली. सूत्रसंचलन रो.स्वाती ढाके यांनी केले. यावेळी रोटरीचे अध्यक्ष रो.ॲड.सागर चित्रे, मानद सचिव रो.पराग अग्रवाल, विद्यापीठाचे डॉ.एस.एस.घोष, डॉ.एन.डी.नंदी, इंटरक्ट कमिटी चेअरमन डॉ.काजल फिरके, सहप्रांतपाल जितेंद्र ढाके, डॉ.प्रा.पुनम मानधुने आणि इतर रोटरी पदाधिकारी व विविध शाळेतील शिक्षक यांची प्रमुख उपस्थिती होती.






**✻ १४ ऑक्टोबर –** रोजी रोटरॅक्ट क्लब ऑफ आय.एम.आर. चे पदग्रहण समारंभ पार पडला. यावेळी रोटरॅक्ट अध्यक्ष म्हणून डॉ.धनश्री चौधरी तर सचिव पदी यामिनी भाटिया हिने पदभार स्वीकारला. याप्रसंगी रो.प्रा.पुनम मानुधने, आय.एम.आर.चे डायरेक्टर प्रा.डॉ.बी.व्ही.पवार तसेच रोटरी अध्यक्ष ॲड.सागर चित्रे, मा.सचिव पराग अग्रवाल प्रोजेक्ट चेअरमन डॉ.शमा सुबोध व इतर प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

**✻ १४ ऑक्टोबर –** रोजी रोटरी क्लब जळगाव तर्फे आयोजित कार्यक्रमात एस.एस.मणियार विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्या द्वारे बसस्थानक येथे सायबर गुन्हे व हुंडाबंदी या विषयी ग्रामीण भागातील ४०० ते ५०० प्रवाशांमध्ये कायद्याचा जागर करीत जनजागृती केली. अध्यक्ष यावेळी ॲड.सागर चित्रे, मा.सचिव अग्रवाल, लिगल एड कमिटी चेअरमन ॲड.हेमंत भंगाळे, प्रकल्प प्रमुख ॲड.महेश भोकरीकर यासह रोटरी क्लब जळगाव तसेच मणियार विधी महाविद्यालयाचे पदाधिकारी उपस्थित होते.





**✻ १७ ऑक्टोबर –** रोजी एस.टी.महामंडळाच्या जळगाव आगारातील बस साठी प्रमुख गावांच्या नावाचे फलक रोटरी क्लब जळगाव तर्फे वितरीत करण्यात आले. यासाठी नॉन मेडीकल कमिटी चेअरमन डॉ.तुषार फिरके, प्रोजेक्ट चेअरमन रो.रितेश जैन, तेजस पवार यांनी परिश्रम घेतले.

# ऑक्टोबर महिन्यातील प्रोजेक्टस्

✻ १७ ऑक्टोबर – रोजी उडान संस्थेतील विशेष मुलांसाठी रोटरी क्लब जळगाव च्या सारेगम या सांगितीक ग्रुपने हिंदी, मराठी गीतांचा कार्यक्रम आयोजित केला होता. मुलांनी हा कायर्क्रम खूप एन्जॉय केला. सारेगम ग्रुप तर्फे १५,५००/– तर सौ.विजया कंवरलाल संघवी यांनी २५,०००/– चा धनादेश या संस्थेस आर्थिक मदत म्हणून दिला. याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा हर्षाली चौधरी रोटरी क्लबचे अध्यक्ष ॲड.सागर चित्रे , मा.सचिव पराग अग्रवाल, असि.गव्हर्नर जितेंद्र ढाके तसेच रोटरीतील इतर मान्यव उपस्थित होते.







✻ २९ ऑक्टोबर – रोजी रोटरी क्लब जळगाव तर्फे दिवाळी निमित्त मिठाई व फराळाचे वाटप रेल्वे स्टेशन तसेच पांझरापोळ संस्था येथे करण्यात आली. या प्रोजेक्टचे प्रायोजकत्व रो.कंवरलालजी संघवी यांनी केले. यावेळी अध्यक्ष रो.ॲड.सागर चित्रे, मानद सचिव रो.पराग अग्रवाल, असि. गर्व्हनर रो.जितेंद्र ढाके, प्रोजेक्ट चेअरमन रो.डॉ.तुषार फिरके व इतर रोटरी पदाधिकारी उपस्थित होते.

७X७X७ प्रोजेक्ट–अंतर्गत दर महिन्याप्रमाणे या महिन्यातही व्याख्याने झालीत.





## रो.स्व.रतनजी टाटा यांना भावपूर्ण श्रद्धांजली..

आपल्याला अभिमान आहे स्व.रतनजी टाटा हे रोटरी क्बल ऑफ बॉम्बे चे सक्रीय सदस्य होते. रोटरी फाऊंडेशनला दरवर्षी देत असलेल्या देणगी मुळे त्यांना ए.के.एस. सदस्यत्त्वाचा सन्मान प्राप्त झाला होता. त्यांनी खऱ्या अर्थाने रोटरी व्हॅल्युज जपल्या आणि जगल्या. आपल्या सर्व रोटरीयन समोर एक आदर्श स्थापित केला. रोटरी क्लब ऑफ जळगाव तर्फे शतश: नमन व आदरपूर्वक श्रद्धांजली... **वैभवाप्रति येते जाता, सचोटीसवे करूनी दान !**
**तेहेतीस कोटी उभे राहिले. स्वर्गामध्ये द्याया मान!**

# फादर ऑफ रोटरी फाऊंडेशन


रो.आर्क.सी.क्लम्फ

रोटरी फाऊंडेशनची कल्पना १९१७ मध्ये मांडण्यात आली. तेव्हा रोटरी किशोरवयीन अवस्थेत होती. आर्किबाल्ड (आर्क) कूपर क्लम्फ हे रोटरी वर्ष १९१६–१७ दरम्यान आर.आय. अध्यक्ष होते. यापूर्वी ते आर.आय. साठी संविधानाचा मसुदा तयार करणाऱ्या समितीचे अध्यक्ष होते आणि जिल्हा प्रशासनासाठी राज्यपालांसह रोटरी जिल्ह्यांच्या स्थापनेची शिफारस केली होती. आर्क क्लम्प, एक संगीतकार आणि एक यशस्वी व्यापारी, एक वचनबद्ध रोटेरियन होते. जे स्वतःला 'रोटरीचा विचार करणारा, रोटरीचे स्वप्ने पाहणारा माणूस म्हणून वर्णन करतात.

१९१३ मध्ये आपल्या क्लबच्या अध्यक्षपदाच्या शेवटी रोटेरियन्सना संबोधित करताना, त्यांनी सुचवले की क्लबने एक आपत्कालीन निधी तयार करावा ज्यामुळे क्लबला भविष्यात अनेक चांगल्या गोष्टी करण्यास मदत होईल. अटलांटा अधिवेशनात त्यांनी या निर्मितीचा प्रस्ताव दिला. 'आंतरराष्ट्रीय स्तरावर रोटरीसाठी एंडोमेंट फंड.'

२०१७ च्या आंतरराष्ट्रीय अधिवेशनातील क्लुम्फच्या शब्दांवर: 'आम्ही या वर्षी संस्थेला रोटरीसाठी भविष्यातील एंडॉवमेंट फंडाच्या शक्यतेसाठी बोलावले आहे. आम्ही जसे आहोत तसे, एक विविध समुदाय चालू ठेवतो. सेवा, हे ठळकपणे योग्य वाटते की आपण धर्मादाय, शैक्षणिक किंवा समुदायाच्या प्रगतीच्या इतर मार्गांसाठी देणग्या स्वीकारल्या पाहिजेत किंवा अशा निधीचा उपयोग विस्ताराच्या कामासाठी केला जाऊ शकतो जगातील सर्व राष्ट्रांमध्ये रोटरी क्लब स्थापन करण्याच्या उद्देशाने काही ठराविक रक्कम रोटरीला दिली जाऊ शकते. रोटरीचा विस्तार आणि 'जगात चांगले कार्य करण्यासाठी' एन्डॉमेंट फंड ही दोन्ही त्यांची सर्वात प्रिय स्वप्ने होती.

आर्क सी. क्लम्फ – त्यांनी १९१५ मध्ये क्लबसाठी एस.आर.सी.सी. मसुदा तयार केला जिल्ह्यांच्या रचनेची शिफारस रोटरी फाऊंडेशन (टीआरएफ) च्या इतिहासात रोटरी क्लबचे नावही सुवर्ण अक्षरात लिहिले जाणार आहे. रोटरी क्लब ऑफ कॅन्सस सिटी, मिसूरी, यूएसए मधील पत्रांनी यूएस डॉलर २६.५०, कॅन्सस कन्व्हेन्शनचा अतिरिक्त निधी जो क्लब आर्क क्लम्फसाठी स्मृतिचिन्ह विकत घेण्यासाठी ठेवत होता, प्रस्तावित एंडोमेंट फंडासाठी दान करण्याचा निर्णय घेतला. . विशेष म्हणजे दुसरे योगदान जगातील दुसऱ्या क्लबकडून आले. रोटरी क्लब ऑफ सॅन फ्रान्सिस्को. 'पुन्हा जरी युएस डॉलर १० ची थोडीशी रक्कम असली तरी, बॉल फिरत राहण्याचा हेतू होता.' रोटरी फाउंडेशनची ही माफक सुरुवात होती. जी आज रोटरी इंटरनॅशनलच्या मालकीची सर्वात प्रतिष्ठीत संस्था आहे आणि यूएसएच्या दहा लाखाहून अधिक धर्मादाय संस्थांपैकी ५० मध्ये एक आहे. २०१९ च्या फोर्ब्सच्या यूएसच्या १०० सर्वात मोठ्या धर्मादाय संस्थांच्या यादीमध्ये, टीआरएफ ४५ व्या स्थानावर आहे.

१९२८ मध्ये निधी संकलनाने युएस डॉलर ५.००० चा टप्पा ओलांडला आणि त्याच वर्षी मिनियापोलिस येथे झालेल्या आर.आय. अधिवेशनाने या फंडाचे नाव रोटरी फाउंडेशन असे ठेवले. पहिले पाच विश्वस्त होते: आर्क क्लम्फ, शिकागोचे रुफस चॅपिन, न्यूझीलंडचे चार्ल्स रोड्स, टेक्सासचे हॅरी रॉजर्स आणि एल.जी. लंडनचा स्लोन. द रोटरी फाऊंडेशन रोटरी अमर करेल याबद्दल आर्क क्लम्फला कमीत कमी शंका होती. ते म्हणाले: 'रोटरी फाऊंडेशन हे विटांचे किंवा दगडाचे स्मारक बांधण्यासाठी नाही. संगमरवरी काम केले तर ते नष्ट होईल; पितळेवर काम केले तर काळ ते विस्कळीत होईल, पण जर आपण अमर मनांवर काम केले तर, जर आपण त्यांना आपल्या वस्तूंमध्ये व्यक्त केल्याप्रमाणे रोटरीच्या आत्म्याचा पूर्ण अर्थ लावला तर... आपण त्या टेबलांवर असे काहीतरी कोरत आहोत जे सर्व अनंतकाळ उजळेल.' १९३० मध्ये, एंडोमेंट फंडासाठी आर्क क्लम्फच्या सूचनेनंतर तेरा वर्षांनी, रोटरी फाउंडेशनने पहिले अनुदान दिले. योगायोगाने रोटरीचे संस्थापक पॉल हॅरिस यांनीही यासाठी पुढाकार घेतला होता. इंटरनॅशनल सोसायटी फॉर क्रिप्ल्ड चिल्ड्रन (नंतर त्याला इस्टर सील्स म्हटले गेले) समान रक्कम अनुदान देण्याच्या विनंतीसह त्यांनी टीआरएफ ला युएस डॉलर ५०० दान केले.

# इतिहासातील सुवर्ण पान

**माजी अध्यक्ष रो.सुरेंद्र लुंकड**




माजी अध्यक्ष रोटेरियन सुरेंद्र लुंकड हे१९७७ साली रोटरी क्लब जळगावशी जोडले गेले.१९८७ –८८ ला ते आपल्या क्लबचे अध्यक्ष होते. त्यावेळेस मीटिंग आय. एम .ए. हॉलमध्ये व्हायच्या. त्यांच्या मनात रोटरी साठी भव्य इमारत उभारण्याची संकल्पना आली. यास छबिल काकांनी पाठिंबा दिला आणि त्यांच्या कार्यकाळात सहा महिन्यात रोटरीची भव्य इमारत बांधण्यात आली. यासाठी डॉ. जी डी बेंडाळे आणि भैय्यासाहेब लुंकड यांनी उदार हस्ते डोनेशन देऊन, बाकी सदस्यांनी आपापल्या परीने डोनेशन देऊन भव्य रोटरीची इमारत तयार झाली. या इमारतीचे उद्घाटन मुंबईचे गव्हर्नर श्री जगदीश खन्ना यांनी केले. तसेच त्यांच्या कार्यकाळामध्ये झुणका भाकर केंद्र ५० पैसे मध्ये दाणा बाजार रेल्वे स्टेशन येथे सुरू करण्यात आले . लोकांनी त्याचा भरपूर फायदा घेतला. दरम्यान इदगाव येथे मेडिकल कॅम्प घेण्यात आला. तो आजपर्यंत लोकांना आठवणीत आहे. पोलिओ प्लस हा उपक्रम दर रविवारी आपल्या रोटरीच्या हॉलमध्ये सुरू होता. असेच बरेच प्रोजेक्ट त्यांनी प्रेसिडेंट असताना घेतले आहेत. ४७ वर्षापासून सदस्य असलेले सुरेंद्रभाई आज सुद्धा क्लब मध्ये सक्रीय असतात.






# रो.डि.३०३० (४६ दिवस) फिटनेस चॅलेंज

दरवर्षी प्रमाणे या वर्षी रोटरी क्लब ऑफ अकोला नॉर्थ यांनी ४६ दिवस फिटनेस चॅलेंज कॅम्पीटीशन आयोजित केली आहे. १४ नोव्हेंबर ते ३० डिसेंबर असा त्याचा कार्यकाळ राहील. ही स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे. तरी जास्तीत जास्त संख्येने यात सहभागी व्हावे. असे प्रकल्प प्रमुख माजी अध्यक्ष रो.डॉ.जुगल चुरानिया यांनी आवाहन केले आहे.



# ऑक्टोबर महिन्यातील काही छायाचित्रे


























## जीवेत् शरदः शतम्...!

| | |
|---|---|
| १) ३ नोव्हेंबर | पीपी रो. विजय मोहता |
| २) ३ नोव्हेंबर | रो. डॉ. ज्ञानेश पाटील |
| ३) ४ नोव्हेंबर | पीपी रो. नित्यानंद पाटील |
| ४) ५ नोव्हेंबर | रो. डॉ. पांडुरंग पाटील |
| ५) ५ नोव्हेंबर | रो. हिमांशु इंगळे |
| ६) १२ नोव्हेंबर | रो. आशुतोष पाटील |
| ७) १८ नोव्हेंबर | रो. गिरीष कुलकर्णी |
| ८)२६ नोव्हेंबर | रो. शुभदा कुलकर्णी |
| ९) २७ नोव्हेंबर | रो. डॉ. योगेंद्र कासट |

## नांदा सौख्यभरे...

| | | |
|---|---|---|
| १) | ६ नोव्हेंबर | रो. पवन बजाज |
| २) | १२ नोव्हेंबर | पीपी मोहन व शुभदा कुलकर्णी |
| ३) | २२ नोव्हेंबर | पीपी रो.संदीप शर्मा |
| ४) | २५ नोव्हेंबर | रो. जयवर्धन नेवे |
| ५) | २७ नोव्हेंबर | रो. रविंद्र पाटील |
| ६) | २८ नोव्हेंबर | रो. आसिफ मेमन |

## नोव्हेंबर महिन्यातील कॅप्टन

सदर कॅप्टन यांनी नोव्हेंबर महिन्यात क्लबच्या सर्व कमिटी चेअरमन यांचेशी समन्वय साधून त्यांच्या कामात मदत करणे.

दीपावली शुभां रम्या, सकलानंद प्रदायिनी।
भगवत्या प्रसादेन, सर्वदा मंगलम् भवेत्॥
दीपावली महापर्वम्। सर्व संतोष कारकम्॥
देवादि सर्वजीवानां। आयुरारोग्य दायकम्॥



रो. रितेश जैन



रो. उदय पोद्दार

## अभिनंदन!

* रो.पी.पी.प्रेम कोगटा यांची रो.वर्ष २०२५-२६ साठी जॉईंट डिस्ट्रीक्ट लर्निंग फॅसिलीटेटर म्हणून निवड करण्यात आली.

* क्लबचे अध्यक्ष ॲड.रो. सागर चित्रे यांना खान्देश सन्मान पुरस्कार २०२४ ने सन्मानित करण्यात आले.

* रो.गिरीश कुलकर्णी यांना दैनिक भास्कर ९४.३ माय एफएम च्या वतीने सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबद्दल आयकॉन्स् ऑफ जळगाव पुरस्कार देण्यात आला.

* सी.ए.रो. रविंद्र पाटील यांचे महाराष्ट्र सरकारच्या क्रीडा महोत्सवातील कमिटीमध्ये निवड करण्यात आली.

* रो. राजेश यावलकर यांची कन्या कु.अश्लेषा यावलकर हिने चिन येथील ब्रिक्स आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेत सरकारी योजनांवरील पेपरचे सादरीकरण केले.